# महिन्याचा विचार

भगवदगीतेतील योग–

मायेच्या रूपाने या जगात जन्म घेऊन आपल्या लेकरांचे उन्नयन करणाऱ्या सच्चिदानंद परब्रह्माला वंदन असो. अर्जुन, व्यास आणि हजारो वर्षांपूर्वी भगवान श्रीकृष्णाने केलेला उपदेश जतन करून ठेवणाऱ्या गुरूजनांना नमस्कार असो. सतत ताज्या आणि उत्फुल्ल अशा अमृताचा न सरणारा सागर म्हणजे गीता! दरवेळी तुम्ही त्यांत बुडी(डुबकी) मारली की नवा ताजातवाना करणारा अनुभव तुम्हाला येतो आणि कुठल्याही भ्रमाविना जीवनाला सामोरे जाण्याचे धैर्य आणि ताकद तुम्हाला प्राप्त होते. भगवंत अतिशय स्पष्ट शब्दांत असे प्रतिपादन करतात की हे विश्व (जग) अनित्य (अशाश्वत किंवा संक्रमणावस्थेतील) आणि असुख यांच्या पासून बनलेल्या मायेचे आहे आणि ''अशा तापदायक संक्रमणकारी जगात जन्म घेतल्यानंतर, स्वत:ला माझ्या चरणांवर झोकून द्या'' असे भगवंताचे कथन आहे. यापुढे जाऊन ते असेही प्रतिपादन करतात की गुणरूपातील माया उल्लंघून जाणे अवघड असले तरी हा भवसागर तरून जाण्यासाठी उपलब्ध असलेले ते एकमेव जहाज आहे.

कशा प्रकारचे समर्पण भगवंताला अभिप्रेत आहे? जेव्हा जेव्हा मी भगवद्‌गीतेची पाने चाळतो, तेव्हा तेव्हा मला त्यात समन्वय आढळतो. 'मन्मना' या एका शब्दांत भगवंताने राजयोग किंवा पतजंली योगाचे महत्व अधोरेखित केलेले आहे. अंत:करण परमेश्वराने भरून टाका.



विषयकारी कृतींचा त्याग करा आणि ब्रह्मकारी कृतींचा अंगीकार करा. विषयवृत्तींनी मनाला यातना दिल्या की माणसाचा तोल जातो. मनाच्या हिंसक हेलकाव्यांनी, समतोलत्व भंग पावते(नष्ट होते). खरे पाहता मानसिक तोल गेल्यावरच क्लेश(हाल) होतात. अशा वृत्तींचे निर्दालन केले की मनामध्यें फक्त ईश्वर वास करून राहतो आणि मानवाचे क्लेश(पीडा) दूर होतात.

त्यानंतर येते पराभक्ती! श्री शंकराचार्यांच्या मते पराभक्ती म्हणजे स्वशोध. या शोधाचा परिपाक म्हणजेच कालांतराने आत आणि बाहेर ''स्व'' सापडतो. ''मदभक्त'' –साधकाने (जणू) स्वत:चे अस्तित्वच भगवंताने भरून टाकलेले आहे. आता ''त्याचा'' भक्त झाल्याने जणू(साधक) सर्वदूर फक्त आणि फक्त ईश्वराचीच प्रचिती येत असते. त्याला वैश्विक सद्‌भावाची जाणीव होते. या ज्ञानसाधनेने साधक निर्भय बनतो आणि त्याचे सर्व भ्रम(भ्रांती) दूर होतात.

ज्याला सतत आत आणि बाहेर ईश्वराची (किंवा 'स्व' चीच) प्रचिती येत असते, अशी व्यक्ती मग काय करते? ती व्यक्ती या अनुभवाने फक्त स्वत:लाच समृद्ध करते का? नाही. अशा आत्म्यासाठी भगवंताने ''सर्व भूतहितेरत:''(सर्व आत्म्यांच्या उत्थानामध्ये अंत:करणपूर्वक रस असलेली व्यक्ती) अशी संज्ञा वापरलेली आहे. अशा प्रकारे राज आणि ज्ञान योगांमध्ये कर्मयोग समाविष्ट करण्यात आलेला आहे. 'मध्याजी'!



''त्या''च्यासाठी तुमच्या सर्व कृती करा. (तुमचे कार्य त्याच्या चरणी समर्पित करा.) स्वार्थ त्यागाची कृती म्हणून तुम्ही सर्व कृत्ये आणि त्यांची फळे ''त्या'' चरण कमलांवर अर्पण करा. ''त्या'' चे साधक म्हणून स्वत:कडे बघा. अहंकाराला दूर सारा. आपण इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत ही भावना मनातून काढून टाका. ''त्या'' ची शक्ती तुमच्या रूपाने काम करीत असते हे जाणून घ्या. ज्यावेळी ईश्वर तुमच्यातील ही शक्ती काढून घेतो त्यावेळी फक्त लांडग्यासाठी आणि कोल्ह्यासाठी अन्न उरते. भगवंताची लीला तो तुमच्यातून दाखवत असतो (प्रत्ययाला आणून देत असतो.) हे त्याचे मोठेपण आहे. त्यानंतर ''मम् नमस्कार'' ही संकल्पना येते. मला साष्टांग दंडवत घाला. यंत्रवत जमिनीवर तोंड खाली करून पडणे म्हणजे नमस्कार येथे अभिप्रेत नाही. बाह्यकारी असे नमन फक्त प्रतीकात्मक असते. साधकाच्या अंतर्मनात जेव्हा आत्म निवेदन प्रकट होते, तेव्हा भगवंताच्या पायावर संपूर्ण, अमर्याद लोटांगण साधकाने घालावयाचे असते. अशा रितीने परमेश्वराच्या पायी स्वत:ला स्वाधीन केल्यावर भक्ताला ''माधुर्य रसा'' चा (दैवी प्रेमाचे अमृत) अनुभव येतो. (माधुर्य रस चाखता येतो) यामध्येच मन: शांती अनुस्यूत असते. अशा आत्म निवेनदनात आनंद, आशीर्वाद, अमरत्व

आणि आद्यन्तहीनत्व (आदि व अंत नसलेले) सामावलेले असतात.

साधकाने हे योगाचे चारही प्रमुख मार्ग अंगिकारले की तो भगवंताला सहजगत्या प्राप्त करू शकतो. ''मामेवश्यसि''(तू माझ्यात सामावून जातोस).
भगवत् प्राप्तीचे अंतिम ध्येय(मत्पारायण:) साधकाने स्वत:समोर ठेवले की मगच तो या मार्गाने पुढे जाऊ शकतो. (प्रगती करू शकतो) सुदैवाने भारतीय भूमीत भगवंताच्या चरणकमलांची धूळ(रज) जागोजागी पडलेली आढळते आणि त्याच्या असंख्य दूतांनी आपणांस वेळोवेळी भारतीय संस्कृतीची तोंड ओळख करून दिलेली आहे. क्वचितच भारतातील एखादी पिढी अध्यात्मिक संस्कृती नसलेली आढळेल. अध्यात्मिक गुरूंविना एखादीच भारतीय पिढी आढळेल. जगभर भारताने कायम अध्यात्मिक उपदेशकांच्या भूमिकेतून सर्वत्र नि:स्वार्थ सेवेचा आणि वैश्विक प्रेमाचा संदेश दिलेला आहे.

भारतवर्षाच्या मुलांनो! जागे व्हा!! भगवंताच्या शंखातून निघणारा ध्वनी ऐका. तुमच्या अंत:करणाच्या अगदी आतल्या कप्प्यात तो तुम्हाला गीतेचा संदेश पोहोचवेल. त्या पताकेच्या मदतीने तुम्ही प्रेम आणि सेवा या आयुधांनी विश्व काबीज करा.

–''योग – समन्वय '' या
आगामी अनुवादीत पुस्तकातील प्रकरण
मूळ लेखन – स्वामी शिवानंद सरस्वती,
भावानुवाद – डॉ. नितीन देशपांडे



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

- ❊ मार्च २०१८ महिन्याचा सत्संग श्री. आनंद राव यांचे घरी दि. ११ मार्च रोजी संपन्न झाला.
- ❊ ''दिव्य जीवन'' या मासिक पत्रिकेचा अंक परिवारातील सदस्यांना वितरीत करण्यात आला.

**पुणे शाखेचा पत्ता**

श्री. गो. आ. नगरकर
'स्वानंद एस् २०,
सहजीवन सोसायटी,
पर्वती, पुणे ४११००९
मो. ९३७०५७०२०६

श्री.नितीन देशपांडे
'ईशावास्य'
प्लॉट नं. ४९/सायंतारा,
डी.एस.के. विश्व, धायरी,
पुणे ४११०४१
मो.नं. ९८५०९३१४१७
९८५०८२६९९०

बुक पोस्ट

प्रति





# दिव्य जीवन

वर्ष १३/अंक ४
एप्रिल २०१८



**Who is God?**

God is satchidanand (existance absulate, Knowledge absolute & bliss absolute.) God is Truth. God is the light of lights. God is all pervading intelligence. God is all pervading power that governs this universe & keeps it in perfect order. He is the inner ruler of this body & mind (Antaryamin). He is omnipotent, omniscient & Omni present. He has the Six attributes of Jnana (Wisdom), Vairagya (Dispassion) , Bala (strength), Aisvarya (Siddhis or Powers), Sri (Wealth) & Kirti(fame) Hence he is called Bhagavan.

- Swami Sivananda